

# १०. भाजी घ्या, भाजी


- गाणे ऐका. म्हणा.
- चित्र पाहा. सांगा. ऐका. दाखवा.

भाजी घ्या हो भाजी,
ताजी ताजी भाजी.
चवळी कोवळी कोवळी,
लिंबे आंबट पिवळी.
पालक, शेपू, मेथीची,
जुडी हिरव्या पातीची.
मिरची तिखट मोठी,
आणली चवीसाठी.
मुळा, गाजर, कांदा,
आणला की हो दादा.
वांगी घ्या नि टमाटे,
पराठ्याला बटाटे.
काकडी अन् कोथिंबीर,
छान होते कोशिंबीर.



- गाण्यात आलेली भाज्यांची नावे सांगा.
- गाण्यात आलेल्या पदार्थांची नावे सांगा.
- चित्रे पाहा. ऐका. म्हणा. नावे वाचा.






लिंबू मेथी मिरची मुळा गाजर कांदा टमाटा